## प्रकरण पाचवे

# उपसंहार

# प्रकरण पाचवे

## उपसंहार

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक परिस्थितीचा मूलगामी असा अभ्यास केला होता. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समजाशास्त्र, इतिहास इ. विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांच्या अभ्यासातून त्यांनी अनेक ग्रंथाचे लेखन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महात्मा फुले यांना गुरु मानून सामाजिक, आर्थिक, धार्मिक गुलामगिरीविरुध्द शूद्रातिशूद्रांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे सर्वांगीण परिवर्तन त्यांना घडवून आणावयाचे होते. बाबासाहेब आंबेडकरांच्या समाज परिवर्तनाच्या चळवळीत सुरुवातीस महार, मांग, चांमार, मराठा, सी.के.पी. ब्राम्हण अशा जातीतील लोकांचा सहभाग होता. डॉ. आंबेडकरांची चळवळ ही कुठल्याही जाती विरुध्द नव्हती, आणि कुठल्याही जातीपुरती मर्यादित अशी कधीच नव्हती. स्वातंत्र्य, समता, बंधुता हा तर डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा आत्मा होता. डॉ. आंबेडकरांनी शोषीत पिडीत, कामगार, मजूर, अस्पृश्य, महिला अशा लोकांच्या कल्याणासाठी चळवळी उभारल्या. लढे उभारले. हे करीत असताना त्यांना एकाचवेळी सवर्ण हिंदू व ब्रिटीशांबरोबर या लोकांच्या हक्कासाठी झगडावे लागले. अस्पृश्यांना माणूसकीचे हक्क मिळावेत म्हणून त्यांनी त्यांचे संघटन केले. सत्तेत व घटना समितीत असताना त्यांच्या हितासाठी एकाकी झुंज दिली. त्यांच्यानंतर ही त्यांचे विविध क्षेत्रातील कार्य अस्पृश्यांसह संपूर्ण मानवी समाजाला दिपस्तंभासारखे मार्गदर्शक असेच आहे.

डॉ. आंबेडकरांपूर्वी अस्पृश्यांची चळवळ उभारण्याच्या दृष्टीने काही सुधारकांनी प्रयत्न केले होते. १९ व्या शतकाच्या मध्यास महात्मा जोतिबा फुले यांनी प्रथम प्रस्थापित व्यवस्थेला आपल्या लेखणी व वाणीद्वारे हादरे दिले. जातीप्रथा, पुरोहितशाही, चार्तुवर्ण्यव्यवस्था यामुळे शूद्रातिशूद्रांना कसे हलाखीचे जीवन जगावे लागत होते हे त्यांनी आपल्या ग्रंथातून मांडले. अस्पृश्य बहुजनांचे संघटन, त्यांच्यात सुधारणा करणे, त्यांच्यात विद्येचा प्रसार करणे, त्यांना खरा धर्म काय आहे ते सांगणे व जागृत करणे, पुरोहितशाही नष्ट करणे यासाठी त्यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई फुले यांचे योगदार खूप मोठे होते. अशा प्रकारे १९ व्या शतकात पहिल्यांदा महात्मा फुले यांनी अस्पृश्य बहुजनांची चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. दुर्दैवाने महाराष्ट्रातील आणि देशातील उच्चवर्णीय सुधारकांनी महात्मा फुल्यांच्या समग्र सामाजिक क्रांती करु इच्छिणाऱ्या चळवळीशी आपली नाळ जोडली नाही.

महात्मा फुले यांच्यानंतर अस्पृश्यांतीलच गोपाळ बाबा वलंगकर यांनी अनार्य परिहार दोष निवारण मंडळ नावाची संस्थ निर्माण करुन अस्पृश्यांची चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न केला. किसन फागू बंदसोडे यांनी 'सोमवंशी मित्र' नावाचे पत्र सुरु करुन अस्पृश्यांच्या समस्या, दुःखे, लोकांसमोर, सरकारसमोर मांडली व ही चळवळ पुढे नेली. पुण्याच्या शिवराम जानबा कांबळे यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या सुरुवातीस अस्पृश्यांच्या परिषदा भरवून त्यांचे संघटन करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण, सुधारणा, संघटना असे या अस्पृश्यातील सुधारकांचे प्रयत्न राहिले. बाबासाहेब आंबेडकरांसारखी जरी त्यांना अस्पृश्यांची चळवळ मोठी करता आली नसली तरी त्यांनी ती चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न निश्चितच केला होता.

त्यांच्या नेतृत्वाला, कार्याला, परिस्थितीच्याही काही मर्यादा होत्या. महर्षि विठ्ठल शिंदे यांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षण प्रसार व सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले होते.

राजर्षि शाहू महाराजांनी अस्पृश्यांची चळवळ वाढावी तिचा विकास व्हावा म्हणून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रयत्न केला. त्यांच्यात जागृती करण्यासाठी त्यांच्या शिक्षणाची सोय केली. त्यांच्या परिषदा भरवून अस्पृश्यांच्या चळवळीस अप्रत्यक्षपणे खतपाणीच घातले. बाबासाहेबांच्या नेतृत्वाचे सूतोवाच त्यांनी प्रथम केले. शाहू महाराजांना याचा त्रास झाला. अगदी जीवे मारण्याच्या धमक्या आल्या. पण महाराज डगमगले नाहीत हे विशेष.

बाबासाहेब आंबेडकरांच्यानंतर रिपब्लिकन पक्षाने बाबासाहेबानी घालून दिलेल्या विचारांनुसार काम करण्याचा प्रयत्न केला. पण बाबासाहेब आंबेडकरांच्या हयातील त्यांनी केलेले कार्य आणि रिपब्लिकन पक्षाने केलेले कार्य यात थोडासा फरक जाणवतो. कारण बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या चळवळी उभारल्या त्यांचे स्वरुप हे एका जातीपुरते कधीच नव्हते. १९७० नंतर मात्र रिपब्लिकन पक्ष एकजातीय बनत चालल्याचे दिसते. उलट रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेवेळचा बाबासाहेबांचा दृष्टीकोन तपासून पाहीला तर असे आढळते की, लोहिया, अत्रे, एस.एम. जोशी यासारख्या समविचारी लोकांशी मिळून ते हा पक्ष चालविणार होते. रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेनंतर १९५७ च्या लोकसभेच्या निवडणूकात पक्षाला चांगले यश आले आणि सुरुवातीच्या काही काळात पक्षाने जनमानसात आपली चांगली व लढाऊ प्रतिमा निर्माण केली होती. दादासाहेब गायकवाडांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने सुरु केलेल्या भूमीहिनांचा लढा हा देशातील मोठया लढयांतील

एक होता असेच त्याचे वर्णन करावे लागेल. १९५९ च्या फूटीनंतर पुढे पक्षात सतत फूट होत गेली. पुढे अनेक लोक काँग्रेसमध्ये दाखल झाले. नेतृत्वाची, सत्तेची स्पर्धा यामुळे पक्षाला घरघर लागली. १९७० नंतर रिपब्लिकन पक्षाने रस्त्यावरचे, जनसामान्यांचे प्रश्न घेऊन लढण्याऐवजी तो राखीव जागा, सवलती या सुरक्षित प्रश्नावरच काम करु लागल्याने पक्षाचा जनमाणसावरचा प्रभाव कमी झाला. सततच्या फुटीमुळे व वेगवेगळया राजकीय पक्षाबरोबरच्या युतीमुळे पक्षाचे सुरुवातीचे स्वरुप व धोरणे बदलत गेली. त्यामुळे नेत्यांची विश्वासार्हता कमी झाली. पुढे रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, प्रा. जोगेंद्र कवाडे, रा.सु. गवई यांनी पक्षाची प्रतिमा सावरण्याचा व जनाधार वाढविण्याचे प्रयत्न सुरु केले.

रिपब्लिकन नेत्यांमधील नेतृत्वाची स्पर्धा, त्यातून पक्षाचे पडणारे तुकडे, दलितांवरील वाढते अत्याचार, राजकीय पक्षांची उदासीनता या पार्श्वभूमीवर ९ जुलै १९७२ रोजी दलित पँथर या तरुणांच्या विद्रोही संघटनेचा उदय झाला होता. जशास तसे हे पँथरचे धोरण होते. पँथरची कार्य करण्याची शैली, त्यांची आक्रमकता यामुळे थोडयाच कालावधीत पँथरचे नाव झाले. १९७४ च्या वरळी दंगलीनंतर ही पँथर सोसाटयासारखी फोफावत होती. ग्रामीण भागातही पँथरचे लोण पोहचले. पँथरच्या आक्रमकतेमुळे पँथरचा वचक आणि प्रभाव निर्माण झाला होता. रिपब्लिकन पक्षाच्या संसदीय राजकारणाचे पँथरने कधी अनुकरण केले नाही. पण त्यांच्या फुटीचे अनुकरण मात्र केले असे म्हणावे लागेल. १९७४ मध्ये जाहीरनाम्याच्या प्रश्नावरुन पँथर दुभंगली. ढसाळ व ढाले गट निर्माण झाले त्यातून अनुक्रमे संगारे, महातेकर (१९७५) व अरुण कांबळे, आठवले गट निर्माण झाले. ढसाळांनी कधी काँग्रेस तर कधी जनता पक्षाचे समर्थन केले. यामुळे त्यांच्या भूमिका सतत बदलत राहिल्या.

त्यामुळे त्यांची विश्वासार्हता कमी होत गेली. ढालेंच्या मनमानी कारभारामुळे अरुण कांबळे, आठवले गट निर्माण झाला. पँथरमधल्या फूटी या (रिपब्लिकन पक्षाच्या फुटीचे अनुकरण) अनुवंशिक होत्या असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. पण त्यामुळे पँथरने केलेले कार्य कमी होत नाही. दलितांवर होणारे अत्याचार, बौध्दांच्या सवलतीसाठी राखीव जागा भरणे, झोपडपट्टीवासियांचे प्रश्न, कामगारांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पँथरने लढे उभारले. दीर्घकाल चाललेला नामांतराचा लढा पँथरने यशस्वी लढवला व यशही मिळविले. रिडल्स प्रकरणात पँथर अग्रभागी होती. मंडल आयोगाची अमंलबजावणी व्हावी यासाठी पँथरने १९८२ मध्ये महाराष्ट्रात मुंबई येथे पहिली परिषद घेतली. पुढे मंडल आयोगाच्या समर्थनार्थ् अनेक परिषदा घेतल्या. भटक्या विमुक्तांच्या प्रश्नावर रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर, लक्ष्मण माने,लक्ष्मण गायकवाड यांच्यात चर्चा होत असत व त्यांचे एकमेकांना सहकार्य मिळत.

रानोमाळ गावोगाव भटकणाऱ्या भटक्या विमुक्तांचे प्रश्न गंभीर होते. सततच्या भटकंतीमुळे नागरी जीवन, आरोग्य, शिक्षण संपत्ती यापासून भटका समाज वंचित होता. अशा लोकांना एकत्र करुन चळवळ बांधणे म्हणजे अवघड कार्य होते. १९६० मध्ये पंतप्रधान पंडित नेहरु यांच्या उपस्थितीत सोलापूर येथे भटक्या विमुक्तांची पहिली परिषद भरली होती. तर १९८९ मध्ये सोलापूर येथेच मा. राजीव गांधी (पंतप्रधान) यांच्या उपस्थितीत दुसरी परिषद भरली होती. भटक्या विमुक्तांच्या मागण्यांचे निवेदन दोन्ही पंतप्रधानांना देण्यात आले. पण भटकणाऱ्या समाजाच्या स्थितीत फारसा फरक पडल्याचे दिसत नाही. या समाजाचे सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक असे अनेक प्रश्न/समस्या आहेत. त्या सोडविण्याच्या दृष्टीने लक्ष्मण

माने, लक्ष्मण गायकवाड, बाळासाहेब रेणके, मोतीराज राठोड यांनी प्रयत्न सुरु केले. त्यासाठी समाजाचे संघटन करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण त्यांच्यातही इतर संघटनातील नेत्यांसारखे मतभेद होते. इतर जातीतील चळवळीचा व जागृतीचा विचार करता भटक्या विमुक्तांची चळवळ अजून बाल्यावस्थेत असल्याचे जाणवते.